- एक हजारी माळ, दोन हजारी माळ पाच हजारी माळ इ.

फटाके होलसेल दरात मिळतील

शॉपिंग सेंटर, गाळा नं.३, सागर थिएटरच्या समोर, गायकवाड चौक, करमाळा.

संपर्क : मो.9850746608 / 9763635707



**घोलप हार्डवेअर**

- प्लंबिंग मटेरियल
- नट बोल्ट
- मग • झाडू • टब
- कॅरेट • ताडपत्री
- नायलॉन दोर
- प्लास्टीक कागद





कृषी संदर्भातील सर्व साहित्य मिळेल.

संपर्क : मो.9922111204

पत्ता : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर, बायपास रोड, शाहुनगर, करमाळा.


## शासनाने भावांतर भुगतान योजना लागू करावी

# शंभुराजे जगताप यांची पणनमंत्री ना.रावल यांचेकडे मागणी



करमाळा (सं.प्र.) : हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल विक्री होत असेलतर हमीभाव व मार्केट मधील दर या दरातील फरकाची रक्कम शेतकऱ्यांना अनुदान रूपाने भावांतर भुगतान योजने अंतर्गत दिली जावी; अशी मागणी जगताप गटाचे युवा नेते तथा करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंभुराजे जगताप यांनी पणनमंत्री ना.जयकुमार रावल यांचेकडे केली आहे.

पुणे येथे बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद आयोजित केली होती. याप्रसंगी जगताप यांनी ना.रावल यांची भेट घेऊन वरीलप्रमाणे मागणी केली. मध्यप्रदेश सरकारने अशाप्रकारे भावांतर भुगतान योजना राबवून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा दिला होता. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील बाजार समितीमध्ये विक्री केलेला शेतमाल व हमीभाव दर यातील फरकाची रक्कम भावांतर भुगतान योजने अंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान रूपाने देऊन दिलासा द्यावा. उदाहरणार्थ जर तुरीला हमी भाव दर ७५५० रू. क्विंटल इतका आहे. सध्या मार्केटमध्ये तूर ७००० रूपये क्विंटल इतक्या दराने विक्री होत असेलतर ५५० रूपये अनुदान रूपाने शासनाने शेतकऱ्यांना द्यावेत; अशी मागणी जगताप यांनी केली आहे.

यावेळी पणनमंत्री रावल यांनी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी तब्बल तीन दशके बाजार समितीचे सभापती पदावर केलेले कार्य कौतूकास्पद असल्याचे गौरवोद्गार काढले.


# जि.प.कर्मचारी पतसंस्था निवडणुकीत कमलाभवानी विकास पॅनलचे सर्व उमेदवार विजयी



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये श्री कमलाभवानी विकास पॅनलचे सर्वच्या सर्व १३ जागा विक्रमी मताने निवडून आल्या आहेत. या पतसंस्थेचे २५० सभासद असून करमाळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्वत:ची दोन मजली इमारत असणारी तालुकास्तरावरील पहिली पतसंस्था आहे. पतसंस्थेचा कर्जाचा व्याजदर आठ टक्के असून गतवर्षी संस्थेने सात टक्के लाभांष दिला होता. पतसंस्थेचे स्वत:चे भागभांडवल चार कोटी आहे. सदर निवडणुकीमध्ये नूतन संचालक म्हणनू सुशेन ननवरे, दादासाहेब केवारे, सुर्यकांत मोहिते, शिवाजी खंडागळे, जगन्नाथ भिसे, डॉ.मंगेश झोळ, दत्तात्रय जाधव, कुलदिप दौंड, वैभव माने, नितीन आलाट, पोपट फडतरे, महिला प्रतिनिधी म्हणून सुवर्णा बोराडे व सुरेखा खोबरे या निवडून आल्या आहेत. श्री कमलाभवानी विकास पॅनलची २६ वर्षाची सत्ता सुशेन ननवरे यांच्या नेतृत्वाखाली अबाधित राहिल्याने सर्वच्या सर्व सभासदांनी समाधान व्यक्त केले आहे.


शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

**चिवटे उपहारगृह**



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सॅंडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

एकवेळ अवश्य भेट द्या..!

राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम



शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख
सोलापूर जि.नि.समितीचे माजी सदस्य
श्री कमलादेवी औद्या.वसाहतीचे चेअरमन
करमाळा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष
श्री.महेश नरसिंह चिवटे
आपणांस दि.७ मार्च रोजी असलेल्या
वाढदिवसास लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छुक
क्रेंटा केमिकल
उत्पादक : ● वॉटर सोल्युबल फर्टीलायझर्स ● दुय्यम सुक्ष्म अन्नद्रव्ये ● पिक संवर्धके
● बायो प्रोडक्टस्-निबोळी, प्रोम, झाईम ● सर्व प्रकारचे प्रोडक्टस्
प्लॉट नं ; ए-७ एम आय डी सी टेंभूर्णी, - 413211,ता. माढा, जि. सोलापूर.
मो. ९४२११९६०७७७/९६५७७१६४०१. PH-02183-232207
www.crentachemical.com, E-Mail. cropcare@crentachemical.com




श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन
शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
मा.महेश नरसिंह चिवटे
7 March
आपणांस वाढदिवसाच्या...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
हॉटेल स्वराज
हॉटेल संतोष
प्रोप्रा : विटुकडे बंधू, करमाळा




शिवसेनेचे जिल्हाप्रमुख
मा.श्री.महेश (दादा) चिवटे
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
अजित ॲग्रो एजन्सी
वांगी नं.२, ता.करमाळा.
प्रोप्रा : विलास विठ्ठल ढाणे (९७६३८३७५९०)




करमाळा तालुका पत्रकार संघाचे
अध्यक्ष, सोलापूर जिल्हा
नियोजन समितीचे माजी सदस्य
व आमचे मित्र
मा.श्री.
महेशशेठ चिवटे आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छुक
अशोक बरडे व परिवार
रावगाव, ता.करमाळा
गुडमॉर्निंग ग्रुप
करमाळा, जि.सोलापूर
जेम्स् ऑफ
करमाळा, जि.सोलापूर
अशोक बरडे
सुनील सावरे

**भाड्याने देणे आहे**
करमाळा शहरातील जामखेड रोड टच असलेला
**६ गुंठे प्लॉट** व **४ गाळे** भाड्याने देणे आहे
**संपर्क : मो.नं.9730037666**

## संशयित आरोपीस पकडण्यास गेलेल्या पोलीसांवर आरोपीचा हल्ला

करमाळा(सं.प्र.) : संशयित आरोपीस पकडण्यासाठी गेलेल्या पोलीसांवर संशयित आरोपीसह त्याच्या घरातील महिलांनी पोलीसांवर हल्ला करून शासकीय कामकाजात अडथळा आणला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ महादेव जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की फरार आरोपी रविंद्र उर्फ चांगाळ्या हज्या भोसले (वय-४०) हा वेगवेगळ्या सहा गुन्ह्यात आरोपी असून तो मलवडी येथे आल्याची माहिती समजल्यानंतर तेथे त्याला पकडण्यासाठी मी स्वत: तसेच पोलीस नाईक मनिष पवार, वैभव ठेंगल, पोलीस शिपाई ज्ञानेश्वर घुमरे असे खाजगी वाहनाने तेथे २५ फेब्रुवारीला सायंकाळी सहा वाजता गेलो. त्यावेळी तो खाजगी वाहन पाहून पळून जावू लागला. आम्ही पाठलाग करून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता, त्याने काठीने मारहाण सुरू केली. त्यास आम्ही पोलीस आहोत, तुला अटक करण्यासाठी आले आहोत.. असे सांगितले असतानाही त्याने शिवीगाळ करून तुम्ही माझ्या जवळ आल्यास मी तुम्हाला सोडणार नाही.. असे म्हणून हातातील काठीने माझ्या डोकीत तसेच डाव्या हातावर मारले. तसेच मनिष पवार यांनाही डाव्या हातावर काठीने मारले. त्यास आम्ही आमचे ओळखपत्र दाखवले तरीही त्याने आम्हांस मारहाण करून माझ्या उजव्या हातावर चावा घेतला. इतर पोलीसांनी येऊन त्याला पकडले. त्यानंतर त्याच्या घरातील सारीका रविंद्र उर्फ चंगाळ्या भोसले व काली हज्या भोसले (दोघे रा.मलवडी)हे आले व त्यांनी काही एक ऐकून न घेता आम्हांस मारहाण केली. मनगटावर चावा घेतला तसेच एक महिलेने दगडाने मारहाण केली. या प्रकरणी पोलीसांनी तिघांविरूध्द शासकीय कामकाजाच अडथळा केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकलला टिपरची धडक -एकाचे निधन


करमाळा(सं.प्र.) : मोटारसायकला पाठीमागून आलेल्या टिपरने जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात एकजण ठार व एकजण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात २२ फेब्रुवारीला दुपारी तीन वाजता करमाळा येथील मौलाली माळावर घडला आहे. या प्रकरणी नितीन महादेव भोसले (रा.रेडा, ता.इंदापूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझे वडील महादेव पांडूरंग भोसले व चुलते आजिनाथ पांडूरंग भोसले हे दोघे मोटारसायकलवरून शेलगाव (वीर) येथे मामा आप्पा वीर यांना भेटण्यास आले होते. त्यानंतर ते जातेगाव येथील माझी चुलत बहिण ज्योती रमेश पाटील यांना भेटून दुपारी तीनच्या सुमारास करमाळ्याहून ते आमच्या गावाकडे निघाले होते. त्या दरम्यान मौलाली माळावर पाठीमागून तुषार विजय हाके (रा.खांबेवाडी) हा त्याच्या ताब्यातील टिपर एमएच १६ एइ ९५९९ हा वेगात चालवत आला व त्याने माझे वडील व चुलते असलेल्या मोटारसायकलला पाठीमागून धडक दिली. त्यात माझे वडील महादेव पांडूरंग भोसले यांचे निधन झाले असून माझे चुलते जखमी आहेत. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## समाईक विहिरीच्या पाण्यावरून वृध्दास बेदम मारहाण

करमाळा (सं.प्र.) : समाईक विहिरीचे पाणी घेण्याच्या कारणावरून ७७ वर्षाच्या वृध्दास दोघा जणांनी येऊन दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केले आहे. हा प्रकार ९ फेब्रुवारीला सकाळी सात वाजता पाडळी येथे घडला आहे. या प्रकरणी शिवदास धोंडिबा खराडे यांनी २१ फेब्रुवारीला करमाळा पोलीसात फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की समाईक विहिरीतून पाणी घेत असताना तु पाणी घ्यायचे नाही असे म्हणून पुतण्या अशोक बाबा खराडे व बापूराव नामदेव खराडे दोघे रा.पाडळी हे तेथे आले व त्यांनी पाणी घेवू नको म्हणून शिव्या देऊन लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून गंभीर जखमी केले. त्यामुळे उपचारासाठी जामखेड येथे खाजगी रूग्णालयात थांबावे लागले. उपचार झाल्यानंतर सदरची फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे

**विघ्नहर्ता इंटिरीयर**
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
**देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर**
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका

प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

करमाळा शहरात प्रथम सुरू..! Reg no.42433
**पाटील** स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
उपलब्ध सुविधा
• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे


• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे
• सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

## केळी विकणाऱ्या मित्रा सोबत आला अन् जेवण करताना टेम्पो अंगावर आला

करमाळा(सं.प्र.) : मित्राची केळी विक्रीसाठी कंदर येथील किरण डोके फुड्स कोल्ड स्टोअरेज येथे आणली होती. त्या मित्रा सोबत केळी घेऊन आला. टेम्पोचा नंबर येण्यास वेळ असल्याने चौघे जेवायला बसले. तिघांचे जेवण झाले आणि हा जेवत होता. ज्या टेम्पो समोर जेवत होता, त्याने खाली न पाहता अंगावर टेम्पो घातला आणि गंभीर जखमी झालेला मित्र जीवानिशी गेला. ही घटना कंदर येथे २० फेब्रुवारीला दुपारी चारच्या सुमारास घडली आहे. यात आदित्य सदाशिव कपाळे (मु.पो.पार्डी, ता.किनवट, जि.नांदेड ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २० फेब्रुवारीला माझ्या टेम्पोतून आंध्रप्रदेशातून केळी घेऊन किरण डोके यांच्या कोल्ड स्टोअरेजवर दुपारी चारच्या सुमारास आलो होतो. त्यावेळी माझ्या सोबत माझा मित्र जयंत रविदास बांबोडे (वय-२७, रा.शेणगाव, ता.जिवती, जि.चंद्रपूर) हा आला होता. कंदर येथे केळी खाली करण्यासाठी रांग लागली होती. त्यामुळे मी व माझा मित्र व अन्य दोघेजण असे आयशर टेम्पोसमोर जेवण्यास बसलो. साडेचार वाजता आम्हा तिघांची जेवणे होवून आम्ही उठलो तर जयंत बांबोडे हा तेथे जेवत होता. दरम्यान टेम्पोची रांग कमी झाल्याने मागील टेंम्पो चालकाने जयंत यास न पाहता सरळ टेम्पो सुरू केला व त्याच्या अंगावर घातला. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला सोलापूर येथील यशोधरा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले, परंतु उपचार चालू असताना डॉक्टांनी मयत झाल्याचे जाहिर केले. या प्रकरणी टेम्पोचालक सिध्देश्वर किसन वाळके (रा.भरकई, ता.टेंभी, जि.आदिलाबाद, तेलंगणा) याचे विरूध्द करमाळ पोलीसात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## कमलादेवी संवर्धन कामास ३१ हजार रूपयाची देणगी



करमाळा(सं.प्र.) : श्री जगदंबा कमलादेवी मंदिर ट्रस्टच्या संयोजकाने श्री कमलादेवी मंदिर जतन व संवर्धन कामास गेल्या वर्षापासून सुरूवात करण्यात आलेली आहे. मंदिर जतन संवर्धनाचे काम प्रगतीपथावर असून भक्तांच्या देणगीरूपी सहकार्यातून या कामास सुरूवात करण्यात आलेली आहे. २५ फेब्रुवारीला करमाळा येथील महामुनी ज्वेलर्सचे तानाजी महामुनी यांचेकडून ३१ हजार रूपयाची देणगी मंदिराच्या संवर्धन कामास प्राप्त झाली. यानिमित्त मंदिर समितीकडून महामुनी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंदीर पुजारी रोहित पुजारी, तुषार सोरटे, सहदेव सोरटे, पुरोहित सुशील पुराणिक, अशोक गाठे, पद्माकर सुर्यपुजारी, सेवेकरी, मानकरी व भक्तगण व महामुनी परिवार उपस्थित होते.

**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स**

होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर
प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी
कॉटन साडी, पार्टीवेअर साडी,लेडीज टॉप व कुर्ती,
लेगीज, किड्स वेअर योग्य दरात मिळतील.
टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.

विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रु. मध्ये मिळेल
पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध
पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०...)

# कॅरम स्पर्धेत अख्तर शेख व झहीर बागवान प्रथम बक्षीसाचे मानकरी

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका कॅरम असोसिएशनच्या वतीने शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या कॅरम स्पर्धेत अख्तर शेख व झहीर बागवान यांचा प्रथम क्रमांक आला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक संजय सावंत, शिवसेनेचे संजय शिंदे, महेश निकत सर यांचे हस्ते झाले. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक हृतिक आलाट व गणेश मंडलिक, तृतीय क्रमांक निलेश राक्षे व वैभव साने, चौथा क्रमांक तबरेश सय्यद व दिपक खलसे, पाचवा क्रमांक सोनू करंडे व सागर आलाट तर सहावा क्रमांक जयदिप शिंदे व विकास पवार यांचा आला आहे. यशस्वी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व ट्रॉफीचे वितरण करण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन सचिन घोलप, जयदिप शिंदे,



तबरेश सय्यद, नाना कुलकर्णी, विकास पवार, दिपक खलसे, रियाज बागवान, आख्तर शेख, महेश कांबळे यांनी केले होते.

# संत निरंकारी मिशनचे स्वच्छता अभियान



करमाळा(सं.प्र.) : अमृतजल प्रकल्पांतर्गत स्वच्छ जल-स्वच्छ मन च्या माध्यमातून संत निरंकारी मिशनच्या वतीने श्री क्षेत्र संगोबा येथील आदिनाथ महाराज मंदिराचा अंतर्बाह्य परिसर तसेच सीना नदीचे पात्र अन् दशक्रिया विधी ठिकाणी मोठ्या उत्साहात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. संत निरंकारी मिशनच्या वतीने संपूर्ण भारतात १६०० पेक्षा अधिक ठिकाणी एकाच वेळेस नदीपात्र किंवा पाण्याचे तलाव येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या जन्मदिना निमित्त त्यांच्या सत्प्रेरणेने सन २०२३ पासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासह संत निरंकारी मिशनद्वारे वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, नैसर्गिक आपत्तीवेळी मदतकार्य आदी उपक्रमही राबविले जातात. स्वच्छता अभियान उपक्रमाद्वारे श्री क्षेत्र संगोबा मंदिराचा अंतर्बाह्य परिसर, सीना नदीचे पात्र स्वच्छ करण्यासाठी जातेगाव, निलज, पोटेगाव, पांगरे, वांगी नं.३, वांगी नं.२, केडगाव, निंभोरे, मलवडी, नेरले, उमरड, दहिगाव, रिटेवाडी, चिखलठाण, शेटफळ, वाशिंबे या ठिकाणाहून जवळपास २०० महिला व पुरूषांनी सहभाग घेतला. हे स्वच्छता अभियान राबविण्यासाठी संत निरंकारी मंडळाचे ब्रँचमुखी पोपट थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सेवादल संचालक रमेश वारे, सहाय्यक संचालिका वैशाली सरडे, सेवादल शिक्षक भैरू वळेकर यांचे समवेत सर्व महिला व पुरूष यांनी परिश्रम घेतले. स्वच्छता अभियान समारोप प्रसंगी श्री क्षेत्र संगोबा कमिटीच्या वतीने संत निरंकारी मंडळाचा सन्मान केला.

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
उपलब्ध सुविधा.. • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेंटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी नृत्य अविष्कारातून जिंकली मने



करमाळा(सं.प्र.) : झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलचे अतिशय आनंदमय व उत्साही वातावरणात वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य अविष्कारातून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख यांचे हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून जेऊरचे लोकनियुक्त सरपंच पृथ्वीराज पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कुलचे संस्थापक/अध्यक्ष प्राचार्य जयप्रकाश बिले हे होते. यावेळी उद्योग समुहाचे हरिदास डांगे, निवृत्त पोलीस अधिकारी गोडगे, झरेचे उद्योजक नारायणशेठ आमुळे, सरपंच बंडू घाडगे, माजी सरपंच प्रशांत पाटील, प्रा.राजेश शिंदे, भिमराव घाडगे, रूपाली माने आदी मान्यवर उपस्थित होते. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, कांतारा, राधाकृष्ण, शंकर तांडव नृत्य, विठ्ठल गोरा कुंभार, राम हनुमान, शिवकन्या, छावा, फनी डान्स, रिमिक्स डान्स, लावणी इ. गीतांवर अतिशय सुंदर असे नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रास्ताविक मुख्याध्यापिका अमृता परदेशी यांनी केले. तर सुत्रसंचालन नंदकुमार वलटे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.सतीश कोंडलकर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या संचालिका डॉ.स्वाती बिले, सर्व शिक्षक स्टाफ व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोकलेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सर्वसामान्य रूग्णांचा आधार : डॉ.श्रध्दा जवंजाळ

## आरोग्य शिबीरात ३८०० रूग्णांची तपासणी करून २५ लाख रूपयांची औषधे वाटप





करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्रातील सर्वसामान्य कुटूंबातील रूग्णांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यालय वैद्यकिय उपचारासाठी आधार ठरत आहे. वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात २०२५ हिरक आरोग्य वर्ष साजरे करून कोट्यावधी रूग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहे. ही संकल्पना अभिमानास्पद आहे; असे मत डॉ.श्रध्दा जवंजाळ यांनी व्यक्त केले.

महाशिवरात्री निमित्त श्री क्षेत्र संगोबा येथे मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल करमाळा यांचे वतीने आयोजित मोफत आरोग्य व औषध वाटप शिबीराचे उद्घाटन तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांचे हस्ते झाले. त्याप्रसंगी डॉ.जवंजाळ बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या शिबीरात पहिल्याच दिवशी २६०० तर दुसऱ्या दिवशी २२०० रूग्णांची असे एकूण ३८०० रूग्णांची तपासणी करून २५ लाख रूपयांची औषधे मोफत वाटण्यात आली. या शिबीरात गरूड कॅन्सर हॉस्पिटल अहमदनगर, गांधी फाउंडेशन कराड येथील नेत्रचिकित्सालय, सुविधा हॉस्पिटल बार्शी, तालुका वैद्यकिय अधिकारी कार्यालय करमाळा, जिल्हा वैद्यकिय अधिकारी सोलापूर आदी जवळपास सात नामांकित हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी रूग्णांची तपासणी केली. गांधी चॅरिटेबल ट्रस्ट कराड तर्फे नेत्र तपासणी करून मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे म्हणाले, की पुढील काळात करमाळा तालुक्यातील होणाऱ्या प्रत्येक जत्रा, यात्रा मध्ये अशा प्रकारच्या शिबीराचे आयोजन शिवसेनेच्या माध्यमातून करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची रूग्णसेवा प्रत्येक घराघरात पोहोचवणार असल्याचे सांगितले.

या शिबीरातील ज्या रूग्णांना शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे, त्यांची मोफत शस्त्रक्रिया पुणे, मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये करण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच डोळ्यांचे ऑपरेशन, मोतीबिंदू काचबिंदू आदी शस्त्रक्रिया कराड येथील गांधी हॉस्पिटलमध्ये मोफत करण्यात येणार आहे व लेन्सही मोफत दिली जाणार आहे. ज्यांना सिटीस्कॅन करण्याची गरज निर्माण झाली आहे, त्यांची सोय मोफत पुणे येथील रूग्णालयात करण्यात येणार आहे. शेवटी या आरोग्य शिबीरात रूग्णसेवा करणाऱ्या सर्व डॉक्टरांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

या शिबीरासाठी शिवसेना तालुका प्रमुख डॉ.गौतम रोडे, गुळसडी येथील उद्योजक अजिंक्य पाटील, शहरप्रमुख संजय शिलवंत, वैद्यकिय कक्ष प्रमुख दिपक पाटणे, ओबीसी आघाडीचे तालुका अध्यक्ष अंकुशराव जाधव, युवा सेना उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत राखुंडे, रंभापुरा शाखाप्रमुख निलेश चव्हाण, जेऊर शाखाप्रमुख संजय जगताप, पोथरेचे सरपंच अंकुश शिंदे, आजिनाथ कोळेकर, गंगुबाई शिंदे नर्सिंग कॉलेजचे प्रिन्सीपल सोमनाथ जाधव, कोळगाव शाखाप्रमुख नागेश चेंडगे आदीजण उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलचे डॉ.ओंकार उघडे यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी कमलादेवी ब्लड बँक, गंगुबाई शिंदे नर्सिंग कॉलेज, गंगुबाई शिंदे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, श्रीकांत शिंदे डायलिसीस सेंटर या संस्थेचे कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले.






# फळांचा गाडा चालवतो संसाराचा गाडा..!



करमाळा शहरातील दत्त मंदिर शेजारी एक युवक फळांचा गाडा लावून सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत फळांची विक्री करताना आपणांस पहावयास मिळतो. नाना अवघडे असे या युवकाचे नाव. नाना मुळचा परांडा तालुक्यातील पण तो कामाच्या निमित्ताने करमाळ्याला आला आणि करमाळ्याचाच होऊन गेला. नाना दहावी नापास आहे. केबल व्यवसायाचे काम त्याने आठ वर्ष केले. घरी शेती नाही म्हणून आपण काहीतरी उद्योग केला पाहिजे, हे त्याच्या लक्षात आले. केबल व्यवसायकाकडे काही वर्ष काम केले. तेथील काम सुटल्यानंतर आता काय करायचे ? असा प्रश्न त्याच्यासमोर पडला. मग त्याने ठरवले की, आपण आता टरबूज, द्राक्ष, संत्री, बोरे असे अनेक फळे मार्केट मधून लिलावातून उचलून ते गाड्यावर मांडून तो विकू लागला.

नानाची जेव्हा भेट झाली तेव्हा तो बालपणातील अनेक गोष्टी सांगू लागला. परांड्याच्या बाजारात तिसरीत असताना दहा पैशाला एक तांब्याभर पाणी बाजरात त्याने विकले आहे. त्या मिळणाऱ्या पैशातूनच त्याने आपले शिक्षण पूर्ण केले. पुढे कोल्ड्रींक्सच्या दुकानात काम करून २५ रूपये रोज मिळवला आहे. नानाचे अर्चनाशी लग्न होऊन त्याचा संसार सुखात चालला आहे. नानाला दोन मुले आहेत. शिका.., कष्ट करा.. आणि काम करायला लाजू नका. लाजला की मेला.. हे नानाचे वाक्य मला खूप आवडते. कष्टाला पर्याय नाही, दोन पैसे मिळवायचे असतील तर कष्ट हे करावेच लागतात; असे नाना आवर्जुन सांगू लागला.

नानाचे विशेष म्हणजे आजच्या मोबाईलच्या युगात अँड्रॉईड मोबाईल नाना वापरत नाही तर साधा नोकियाचा मोबाईल वापरतो. याबाबत नानाला विचारले की, नाना अँड्रॉईड मोबाईल का वापरत नाही तर नानाने दिलेले उत्तर खूप मार्मिक होते. ते म्हणजे.. अँड्रॉईड मोबाईल त्यात वेगवेगळे व्हिडीओ व अनेक गोष्टी असतात. गाड्यावर फळे विकताना गिऱ्हाईकांशी मला संवाद साधावा लागतो. मोबाईलच बघत बसलं तर गिऱ्हाईक कसे होणार... म्हणून मी साधा नोकिया कंपनीचा मोबाईल वापरतो.

विशेष म्हणजे नाना एक हसमुख व्यक्तीमत्व आहे. आलेल्या ग्राहकाचे हसतमुखाने स्वागत करतात. त्यांचे एकच म्हणणे आहे, की ग्राहक हा राजा आहे. त्याला जपले पाहिजे. आपल्याकडे असणारी चांगली फळे त्यांना योग्य किंमतीत दिली पाहिजेत. आज विश्वासाने चांगली फले दिली तर त्याचा मोबदला ते चांगला देतात. कष्टाचे फळ निश्चितच चांगले असते; हे सांगायला नाना विसरला नाही. फळ व्यवसायाच्या माध्यमातून अनेक ग्राहक जोडण्याचा प्रयत्न नानाने केला आहे. व्यवसायातून माणसे जोडणे हा माझा छंदच बनला आहे हे सांगायला नाना विसरला नाही.

आजच्या तरूणांना नाना तु काय सांगशील.. असे विचारल्यावर तो सांगू लागला. आज तरूणांना नोकऱ्या नाहीत. कुठलातरी व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह आपण केला पाहिजे. आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत म्हणून काम करत राहिले पाहिजे; हाच आजच्या युवकांना माझा संदेश आहे. म्हणूनच 'फळांचा गाडा नानांचा संसाराचा गाडा चालवतो आहे' हे वाक्य अगदी समर्पक असेच आहे. नानाच्या परिश्रमाला सलाम..!

....प्रा.नितीन तळपाडे, करमाळा.


# कामगार पाहिजे

**न्यु वर्धमान ऑटोमोबाईल्स, सोलापूर-नगर बायपास रोड, करमाळा**

या ऑटोमोबाईल्सच्या दुकानात काम करण्यासाठी अनुभवी व गरजू कामगार पाहिजे. गरजूंनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा..!

**संपर्क : मो.नं.9423334094, 9420666094**


# जेऊर येथे भव्य मिरवणूक काढून शिवजयंती साजरी



करमाळा(सं.प्र.) : संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने जेऊर येथे सनई चौघडा, टाळ मृदुंग व ढोल ताशाच्या गजरामध्ये भव्य मिरवणूक काढून शिवजयंती साजरी करण्यात आली.

शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन माता-भगिणी व वारकरी संप्रदाय व ज्येष्ठ नागरीक यांचे हस्ते करण्यात आले. मुस्लिम समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीस पुष्पहार घालण्यात आला. यावेळी अहिल्यामाता होळकर, राजश्री शाहु महाराज, संत गाडगे महाराज व इतर महापुरूषांची एक हजार पुस्तके उपस्थितांना वाटप करण्यात आली. यावेळी लहान मुला-मुलींनी राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवराय, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, माता रमाई यांच्या वेशभुषेतील रणरागिणी घोड्यांवर स्वार झाल्या. घोडे आणि उंटाचा समावेश मिरवणुकीत होता. जेऊर, शेटफळ व कोर्टी येथील वारकरी संप्रदायातील मान्यवर टाळ, वीण,मृदंगाच्या गजरात मिरवणुकीत सहभागी झाले. रथामध्ये सजावट केलेली आकर्षक छत्रपती शिवाजी महाराजांची मुर्ती लक्ष वेधून घेत राहिली. हा रथ विद्युत रोषणाईने झळाळून निघाला. रथाच्या समोरील बाजूस मावळ्यांची वेशभुषा करून तरूणाईने लक्ष वेधले. या मिरवणुकीत शेटफळ येथील लेझीम पथक हे मुख्य आकर्षण ठरले. योध्दा करिअर अकॅडमीतील मुला-मुलींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गीतावर व देशगीतावर लेझीम सादर केले. तसेच जेऊर, कोंढेज, पांगरे येथील लेझीम पथक मिरवणुकीत सहभागी होते. कोल्हापूर येथील लेझीम करंडी व दांडपट्टा व छत्रपती वीर शिवाजी महाराज ग्रुप व शिवनेरी मर्दानी खेळ, झांजपथक व श्रीराम हलगी ग्रुप, गोफ लेझीम पथक तसेच बाभुळगाव येथील हलगी पथक व स्वराज्य मर्दानी खेळ इ. सर्व पथकांनी आकर्षक अशी कला सादर केली.

शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने सर्व शिवप्रेमींसाठी भोजनाची व्यवस्था केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड व संभाजी ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# गेल्या आठवड्यात एक महिला व तीन पुरूष बेपत्ता

करमाळा : गेल्या आठवड्यात करमाळा तालुक्यातील तीन पुरूष व एक महिला बेपत्ता झाली आहे. याबाबत करमाळा पोलीसात हरवल्याची तक्रार नोंदण्यात आली आहे. यामध्ये मांजरगाव येथील २६ वर्षाचा तरूण, करंजे येथील ६९ वर्षाचे वृध्द तर हिंगणी येथील ३५ वर्षाचे तरूण बेपत्ता झाले असून हजारेवाडी (पोफळज) येथील २८ वर्षाची विवाहिता बेपत्ता झाली आहे. याबाबत करमाळा पोलीसात हरवल्याच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या असून, पुढील तपास सुरू आहे.

# राजे शिवछत्रपती मित्र मंडळाचा अनोखा उपक्रम



करमाळा(सं.प्र.) : समाजाचे आपण काहीतरी देणं लागतो, या हेतूने पुनवर येथील राजे शिवछत्रपती मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी पुनवर ते वडगाव रस्त्याच्या दुतर्फा असलेली काटेरी झुडपे काढण्याचे ठरविले. नुकतेच जेसीबीच्या साहाय्याने ही काटेरी झुडूपे काढली, त्यामुळे वाटसरूंना ये-जा करण्यासाठी रस्ता सुरळीत झाला. शिवजयंतीनिमित्त शिवछत्रपती मित्र मंडळाने राबविलेल्या या उपक्रमाचे पुनवर परिसरातील नागरीकांनी विशेष कौतूक केले.


# आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
fastrack
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.


भावपूर्ण
श्रध्दांजली !
मनी होता भोळेपणा..,
कधी न दाखविला मोठेपणा ।
होता चेहरा हसमुख.., जसा माणुसकीचा झरा ॥
आजही घुमतो स्वर तुमचा कानी ।
वाहताना श्रध्दांजली..,
डोळ्यात येते पाणी ॥
करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटीचे माजी विश्वस्त
विद्या विकास मंडळाचे माजी विश्वस्त
कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक
कण्वमुनी विद्यालय, कंदरचे संस्थापक/अध्यक्ष व आमचे पिताश्री
वै.शंकरराव राजाराम भांगे (मालक)
यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. या दु:खद प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय
व धार्मिक क्षेत्रातील नागरीकांनी तसेच आप्तेष्ट, मित्र परिवार यांनी प्रत्यक्ष भेटून व दूरध्वनीद्वारे संपर्क
साधून आमचे सांत्वन केले व आम्हाला धीर दिला. त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली
दशक्रिया विधी
गुरूवार दि.६/३/२०२४ रोजी सकाळी
७.०० वा कुंभारघाट (पुंडलिक
मंदिरा मागे) पंढरपूर येथे होणार आहे.
आपले नम्र
श्री.नवनाथ शंकरराव भांगे (मा.संचालक, आदिनाथ कारखाना), श्री.भास्करराव शंकरराव भांगे (मा.सरपंच, ग्रा.पं.कंदर)
श्री.सुनील शंकरराव भांगे सर (कण्वमुनी विद्यालय, कंदर) व समस्त भांगे परिवार, कंदर, ता.करमाळा.


शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, पत्रकार संघाचे
अध्यक्ष व आमच्या संस्थेचे चेअरमन
श्री.महेश(दादा)चिवटे
यांना वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा..
7 मार्च
व्हा.चेअरमन
श्री.शहा
सचिव
नासीर कबीर
शुभेच्छुक
श्री कमलादेवी औद्योगिक सह.वसाहत मर्या; करमाळा.
सर्व संचालक व कर्मचारी वृंद